## आयआयएमचा कार्यक्रम • सन्याल यांनी सांगितला यशाचा मंत्र

# सामर्थ्याने परिस्थितीवर नियंत्रण शक्य

नागपूर. आज जगात अनिश्चिततेचे वातावरण आहे. तसे पाहिल्यास अनिश्चितता नेहमीच राहिली आहे. नेहमीच कोणत्या ना कोणत्या समस्या आल्या आहेत. जगात नेहमीच कोणत्या ना कोणत्या विषयाबाबत अनिश्चितता दिसून आली आहे. परंतु सामर्थ्याने परिस्थितीवर नियंत्रण मिळविणे शक्य झाले आहे, असे मत पंतप्रधानांच्या आर्थिक सल्लागार समितीचे सदस्य संजय सन्याल यांनी व्यक्त केले. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयएम) नागपूर येथे 'अनिश्चिततेच्या काळात धोरण कसे ठरवायचे' या विषयावर आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. कोरोना कालावधीचे उदाहरण देताना ते म्हणाले की, अत्यंत कठीण आणि गुंतागुंतीच्या काळातही केवळ अंदाजाच्या आधारे धोरण ठरविले गेले.

## परिस्थितीचा आढावा घेण्यासाठी प्रथम लॉकडाऊन



परिस्थितीचे आकलन करण्यासाठी आणि रोगाचा कल जाणून घेण्यासाठी भारत सरकारने पहिले लॉकडाउन केले. त्यांनी सांगितले की, यादरम्यान सरकारने त्रुटी जाणून त्यावर नियंत्रण ठेवण्यास सुरुवात केली. टीका होऊनही सरकारने सप्टेंबर-ऑक्टोबर 2021 मध्ये हळूहळू लॉकडाऊनचे निर्बंध कमी करण्यास सुरुवात केली. संन्याल म्हणाले की, कोणत्याही देशाचे भविष्य हे संकट सहन करण्याच्या क्षमतेवर अवलंबून आहे. भारत या महामारीतून बाहेर आला, कारण येथील सरकारने लवचिकतेचे धोरण स्वीकारून धैर्याने परिस्थितीचा सामना केला. यशाचा मंत्र सांगताना ते म्हणाले की, वाईट काळात त्वरित कृती करून बचाव करता येते. परिस्थितीचे योग्य निरीक्षण करून त्यावर तात्काळ कारवाई करूनच अनिश्चिततेतून बाहेर पडता येते. आयआयएमचे संचालक डॉ. भीमराया मेत्री यांनी त्यांचे स्वागत केले. आयआयएमचे सीईओ मकरंद आलूर उपस्थित होते.